# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

" (सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ सन २०१७ चा महाराष्ट्र अधिनियम कमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ"

(विद्या विभाग)

राष्ट्रसंततुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ जमनालाल बजाज प्रशासकिय भवन महात्मा जोतिबा फुले शैक्षणिक परिसर, विद्यापीठ कॅम्पस चौक ते अंबाझरी टी–पॉइंट मार्ग, नागपूर – ४४० ०३३.

क्रमांक:रातुमनावि/विद्या/२०२४/५९५ दिनांक १३ डिसेंबर २०२४

## अधिसूचना

## विद्यापरिषदे मधून व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्यपदासाठी निवडणूक घ्यावयाचे निवडणूक वेळापत्रक

या अधिसूचनेनुसार राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या विद्यापरिषद सदस्यांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील **कलम ३०(४)(ञ)** नूसार विद्यापरिषदे मधून व्यवस्थापन परिषद सदस्य पदावर निवडून येण्याकरिता उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल, २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहीत करणारी अधिसूचना. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक १, व विद्यापीठ निदेश क्रमांक ४३/२०२४ नुसार विद्यापरिषदे मधून व्यवस्थापन परिषद सदस्यपदावर निवडून देण्याकरिता मा. कुलगुरुंचे मान्यतेने विद्यापरिषदेची मतदार यादी प्रसिध्द करण्यात येत असून निवडणूक कार्यक्रम खालील प्रमाणे घोषित करण्यात येत आहे.

### निवडणूक वेळापत्रक भाग – १ (मतदार यादी)

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १. | संबंधीत अभ्यास मंडळ सदस्यांमधून व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३०(४)(ञ) विद्यापीठ नुसार **"विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेले दोन सदस्य, ज्यापैकी एक सदस्य परिषदेच्या सदस्य असलेल्या निर्वाचित अध्यापकांमधील असेल व दुसरा सदस्य महिला असेल"** या निवडणूकीकरिता विद्यापरिषद सदस्यांच्या निर्वाचक गणाची मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक. | **शुक्रवार दिनांक १३ डिसेंबर २०२४** |
| २ | विद्यापरिषद सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या प्रसिध्द केलेल्या मतदार यादीवर आक्षेप घेण्याचा दिनांक. | सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०२४ दुपारी ४.००वाजता पर्यंत |
| ३ | निवडणूकीकरिता विद्यापरिषद सदस्यांच्या निर्वाचक गणाची अंतीम मतदार यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक. | सोमवार दिनांक १६ डिसेंबर २०२४ सायंकाळी ५.०० वाजता |

## निवडणूक वेळापत्रक भाग – २

| अ.क्र | विवरण | अंतिम दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | विद्यापरिषद सदस्यांमधून खालील क नुसार नमूद सदस्य निवडून देण्याकरिता विद्यापीठ **निदेश क्रमांक ४३/२०२४ नियम (१२)** नूसार नामनिर्देशन शुल्क रु. २०/– रकमेचा **"वित्त व लेखा अधिकारी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर"** ह्यांचे नावे निर्गमित केलेला राष्ट्रीयिकृत बॅकेचा धनाकर्ष (DD) किंवा विद्यापीठाच्या रोख पटलावर रु. २०/– रोख जमा करुन घेतलेली पावती जोडून बंद लिफाफ्यामध्ये **नामनिर्देशन** पत्र (Nomination Paper) **कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी,** विद्या विभाग प्रथम माळा खोली क्र. २३ जमनालाल बजाज प्रशासकीय भवन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांच्याकडे उमेदवारीकरिता सादर करणे.<br><br>(क) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम **३०(४)(ज) नूसार "विद्यापरिषदेने तिच्या सदस्यांमधून निवडून दिलेले दोन सदस्य, ज्यांपैकी एक सदस्य विद्यापरिषद सदस्य असलेल्या निर्वाचित अध्यापकांमधील असेल व दुसरा सदस्य महिला असेल.**<br>**१) निर्वाचित अध्यापक खुला प्रवर्ग (एक सदस्य)**<br>**२) महिला प्रवर्ग (एक सदस्य)**<br><br>उपरोक्त दोन्ही सदस्य हे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम२०१६ मधील कलम ६५ च्या तरतूदींच्या अधिन राहून सदस्य म्हणून निवडून द्यावयाचा सदस्य हा, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल, २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहीत करणारी अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक १ व विद्यापीठ निदेश क्रमांक ४३/२०२४ नुसार सदस्यांच्या निर्वाचक गणाच्या मतदार यादीत नाव असलेल्या व उमेदवार होऊ इच्छिणाऱ्या आणि उमेदवारीसाठीची पात्रता धारण करणाऱ्या सदस्यांनी उमेदवारीकरिता **नामनिर्देशन** पत्र (Nomination Paper) सादर करण्याचा **दिनांक व वेळ.** | **मंगळवार दिनांक १७ डिसेंबर २०२४ ते शुक्रवार दिनांक २७ डिसेंबर २०२४, सायंकाळी ५.०० वाजता** |
| २. | वर नमूद उमेदवारीसाठी प्राप्त झालेल्या नामनिर्देशन पत्राची **छाननी** (Scrutiny) करण्याचा **दिनांक व वेळ.** | **शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४ सकळी ११. ते १.०० वाजे पर्यंत स्थळ सिनेट हॉल जमनालाल प्रशासकीय भवन** |
| ३. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांची **तात्पुरती यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ** | **शनिवार दिनांक २८ डिसेंबर २०२४, सायंकाळी ५.००वाजता** |
| ४. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांच्या तात्पुरत्या यादीवर मा. कुलगुरुंकडे **अपील सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ.** | **रविवार दिनांक २९ डिसेंबर २०२४ ते मंगळवार दिनांक दिनांक ३१ डिसेंबर २०२४, सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** |

| | | |
|---|---|---|
| ५. | मा. कुलगुरुंनी अपीलांवर निर्णय घेण्याचा अंतिम दिनांक. | बुधवार दिनांक १ जानेवारी २०२५, दुपारी ४.०० ते ५.०० |
| ६. | वर नमूद वैध नामनिर्देशित **उमेदवारांची अंतिम यादी** प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ.** | गुरूवार दिनांक २ जानेवारी २०२५, सायंकाळी ५.३० वाजता |
| ७. | वर नमूद वैध नामनिर्देशित उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट असलेल्या उमेदवाराला **निवडणूकीतून माघार** (Withdrawal) घ्यावयाची असल्यास, त्यासाठी लेखी सूचना सादर करण्याचा **दिनांक व वेळ.** | शुक्रवार ३ जानेवारी २०२५ , सकाळी ११.०० ते सायंकाळी ५.०० वाजता पर्यंत |
| ८. | वर नमूद निवडणूकीसाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्याचा **दिनांक व वेळ.** | शनिवार ४ जानेवारी २०२५, सायंकाळी ५.०० वाजता |
| ९. | वर नमूद निवडणूकीसाठी विद्यापरिषद **सभेच्या सभागृहातील निवडणूकीचा दिनांक व वेळ.** (आवश्यक असल्यास). | मंगळवार ७ जानेवारी २०२५, सकाळी १२.३० ते १.३० वाजता |
| १०. | वर नमूद **निवडणूकीची मतमोजणी सभेच्या सभागृहात** करण्याचा व निवडणूकीचे निकाल घोषित करण्याचा **दिनांक व वेळ.** | मंगळवार ७ जानेवारी २०२५, मतदानानंतर लगेच |

**महत्वाच्या सूचना:**

१. उपरोक्त अधिसूचना, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने निर्गमित केलेला सन २०१७ चा एकरुप परिनियम क्रमांक १, उच्च व तंत्र शिक्षण विभागाची दिनांक २८ एप्रिल, २०१७ ची प्राधिकरणाचा सदस्य म्हणून उमेदवारीसाठी पात्रता व शर्ती विहित करणारी अधिसूचना, विद्यापीठ निदेश क्रमांक ४३/२०२४ व विद्यापरिषद सदस्य मतदार यादी विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election** या पोर्टलवर व विद्यापीठाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहेत.

२. विद्यापीठ संकेतस्थळावरील **Election** या पोर्टलवर प्रसिध्द करण्यात आलेली मतदार यादी विनामूल्य डाऊनलोड करता येईल.

३. नामनिर्देशन पत्र (Nomination Paper), नामनिर्देशन पत्रासोबत संलग्न कराव्या लागणाऱ्या माहितीचे प्रपत्र व निवडणूकीतून माघार घेण्यासाठी सादर करावयाचे सूचनापत्र (Notice of withdrawal), **कुलसचिव तथा निवडणूक निर्णय अधिकारी, विद्या विभाग प्रथम माळा खोली क्र. २३ जमनालाल बजाज प्रशासकीय भवन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचेकडून प्राप्त करुन घ्यावेत.**

४. सुटीच्या दिवशी सुध्दा कार्यालय नियोजित वेळेत सुरु राहील.

मा. कुलगुरुंच्या आदेशान्वये

(डॉ. राजू हिवसे)

**कुलसचिव व निवडणूक निर्णय अधिकारी**

**प्रतिलिपी माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:**

१. विद्यापरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य,
२. विद्यापीठाचे सर्व अधिकारी व शाखा प्रमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
३. संचालक, आयटी सेल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.
यांना विनंती करण्यात येते की, वरील अधिसूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रकाशित करण्याबाबत आवश्यक कार्यवाही घ्यावी.

(डॉ. राजेन्द्र उतखेडे)

उपकुलसचिव विद्या व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी